भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२२१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०३/२०१७

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक २४/०३/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील पिडीत मुलगी हिला एकटी पाहुण यातील आरोपीने पिडीत मुलीस रस्त्यात अडवुन बाल लैगिंक अपराध करण्याचे उद्येशाने तिचे तोंडावर हात ठेवुन जिवाने मारण्याची धमकी देऊन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,३४१,५०६ भादंवि. सहकलम १२ बाल लैगिंक अत्याचार संरक्षण अधी २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) बिना पासपरवाना ०३ ब्रास रेतीची चोरी करुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २५/०३/२०१७ चे ०२.४० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा लोकसेवक असुन पोलीस स्टॉपसह पोलीस जिप गाडीने पेट्रोलींग करीत असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक मध्यें ०३ ब्रास रेती किंमती ६,०००/—रु. ची विना रॉयल्टी पास परवाना चोरीने भरुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादीपोहवा वल्के पोस्टे वरठी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खोकले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) ट्रक चालकांच्या लापरवाहीने एकाच्या मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २४/०३/२०१७ चे ०८.१० वा. दरम्यान यातील मृतक अशोक मुरलीधर निखाडे वय ५३ वर्ष, रा. मानेगाव हा आपल्या सायकलने लाखनी कडुन स्वगावी मानेगाव कडे एनएच ०६ रोड ने सायकलने जात असतांनी लाखनी कडुन साकोली कडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने लापरवाहीने चालुवन मृतकचे सायकलला मागेहुन धडक मारुन सायकलसह एन एच ०६ रोडवर खाली पाडल्याने मृतकचे डोक्याला मागील भागास मार लागुन डोक्यातुन व डावे कानातुन रक्त निघाल्यामुळे यातील फिर्यादीने मृतकास औषधोपचार कामी ग्रामीण रुग्णायल लाखनी येथे भरती केले असता डॉ. ने चेक करुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी राजेश गोपिचंद तितीरमारे वय ४१ वर्ष, रा. मानेगाव/ सडक यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४,१३४(ब)मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. राऊत पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलवर तीनसिट बसवुन अचानक ब्रेक मारुन रोडवर पडुन दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०३/२०१७ चे ०७.३० वा. दरम्यान यातील आरोपी जखमी चालक याने दारु पिऊन आपल्या ताब्यातील मोटार सायकल वर तीनसिट बसवुन साकोली कडे येत असता आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन समोर रोडवर ब्रेकर दिसला असता मोटार सायकल चा एकदम ब्रेक मारल्याने त्याचा मोटार सायकल वरील नियत्रंण सुटल्याने खाली रोडवर पडुन स्वत: व मोटार सायकलचे मागे बसलेले २ मित्र फिर्यादी, आलोक सिंग यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी पप्पुकुमार अशोक निशाद वय २८ वर्ष रा. रांचीपुर्वा जि. गोंडारा, झारखंड यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१८५,१२८/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधी मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) राज्य उत्पादक शुल्क गोंडाऊन मधील साहित्याची चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २५/०३/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण राज्य उत्पादन शुल्क साकोली चे गोंडाऊनचे वरील सिमेंटपत्रे व लाकडी फाटे कापुन गोंडाऊन मधील माल, चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी ब्रिजलाल दादुजी पटले वय ५७ वर्ष राज्य उत्पादन शुल्क साकोली यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४६१,३८०,५११ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :—

दिनांक २५/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. अडयाळ येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १२ लिटर हा.भ. दारू किंमती १२००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.क. ९४२३११५१८२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.